कल्पतरु सहकारी शासकीय सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), अमरावती या संस्थेचा भूखंड गहाणमुक्त करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार पणन व ,वस्त्रोद्योग विभाग,

शासन निर्णय क्र.घबांक ३४१७/प्र.क्र.२०२१/१९-स,

न्यु इंडीया अॅश्युरन्स बिल्डींग, ३ रा मजला,

बॅंक ऑफ इंडीया समोर, एम.जी. रोड,

फोर्ट, मुंबई ४०० ००१

दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ -: १) शासन निर्णय कृषि व सहकार, विभाग एचएसजी-१०८२/४१२-८०/१८-स. दि ०४/१२/१९८२, दि. ०२/०५/१९८४, दि. २०/१०/१९८६, व दि. १२/०७/१९८९

२) संस्थेचा प्रस्ताव दिनांक २८/०५/२०१७

प्रस्तावना -:

कल्पतरु सहकारी शासकीय गृहनिर्माण संस्था (म.), जिल्हा अमरावती या संस्थेतील एकुण १३ पात्र सभासदांना संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये एकुण कर्ज रुपये ४,०७,८२०/- (रुपये चार लाख सात हजार आठशे वीस फक्त) इतके कर्ज मंजूर करण्यात आले होते. तथापि संस्थेला एकुण कर्ज रुपये ४,३७,९८०/- इतके वितरीत करण्यात आले होते.

संदर्भ क्र.२ येथे संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार तसेच सर्व १४ कर्जदार सभासदांनी त्यांना वितरीत केलेली कर्जाची रक्कम त्यावरील व्याजासह शासनास परतफेड केली आहे. तसेच सर्व सभासदांना निर्गमित केलेल्या ना-देय प्रमाणपत्रांवरुन संस्थेला दिलेले कर्ज व्याजासह वसुल झाल्याचे दिसुन येते. संस्थेकडे शासनाच येणे बाकी नसल्यामुळे संस्थेचा भूखंड गहाणखतातून मुक्त करण्याचा संस्थेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर बाब विचारात घेऊन शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

शासन निर्णय -:

कल्पतरु सहकारी शासकीय गृहनिर्माण संस्था (मर्या.), जिल्हा अमरावती या संस्थेच्या एकूण १४ सभासदांना वितरीत करण्यात आलेले गृहबांधणी कर्ज रु. ४,३७,९८०/- (रुपये चार लाख सदोतीस हजार नऊशे ऐंशी फक्त) व त्यावरील संपूर्ण रक्कम व्याजासह शासनास परतफेड केली आहे. सबब सदर संस्थेकडे शासनाचे कोणतेही येणे बाकी नसल्याने संस्थेने शासनाकडे दिनांक १६/०९/१९८७ रोजी गहाण ठेवलेला संस्थेचा भुखंड व त्यावरील इमारत गहाणखतातुन मुक्त करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१७११२९१६०९०५४६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Ashok Shankar Bhujbal

Digitally signed by Ashok Shankar Bhujbal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMTD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d0603fd89ef561b0b051d6283b2c15bb82dcdd5e5dfe04798b8f19ffa9581722, cn=Ashok Shankar Bhujbal
Date: 2017.11.29 16:11:47 +05'30'

(अ.शं. भुजबळ)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखापरीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) (२ प्रती)

२) महालेखापाल, महाराष्ट्र - २, मुंबई (लेखापरीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) (२ प्रती)

३) अधिदान व लेखाअधिकारी.मुंबई ,

४) निवासी लेखापरीक्षा अधिकारी.मुंबई ,

५) सहकार आयुक्त व निबधक ,सहकारी संस्था, पुणे

६) संचालक, विमा संचालनालय, मुंबई गृहनिर्माण भवन (म्हाडा) खोली क्र. २६४, पहिला माळा, वांद्र (पुर्व), मुंबई - ४०० ०५१

७) जिल्हाधिकारी, अमरावती / नागपूर.

८) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अमरावती.

९) जिल्हा विशेष लेखापरिक्षक (१-वर्ग), सहकारी संस्था.अमरावती ,

१०) सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. जि. अमरावती

११) अध्यक्ष ,सचिव/सन्मती जिल्हा परीषद कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था ,(म.) , अमरावती.

१२) निवडनस्ती १९-स, (२ प्रती)